# Sahaj Adhyayan (सहज अध्ययन)

जर हे Practice Question Papers तुम्हाला खरंच फायदेशीर वाटत असतील तर तुमच्या सर्व मित्र मैत्रिणींना पाठवा.

त्यांना देखील ह्या सर्वांचा अभ्यासासाठी फायदा होऊ द्या.

For more study material connect with us on

**Instagram**: www.instagram.com/sahajadhyayan

**YouTube (मराठी माध्यम):** www.youtube.com/sahajadhyayan

**YouTube (Semi/English):**

www.youtube.com/SahajAdhyayanSemiEnglish

**Telegram** (for PDF): t.me/sahajadhyayan

**Facebook**: www.facebook.com/sahajadhyayan

**WhatsApp** (only Message, No calls): **855 289 2890**

For more study material register here
www.sahajadhyayan.in/register

**जर तुमच्या जवळ कोणत्याही इयत्तेच्या, कोणत्याही परीक्षेच्या, कोणत्याही विषयाचे, Question Papers असतील**

**तर ते आम्हाला WhatsApp वर पाठवा,**

**इतर विद्यार्थी मित्रांना त्या सर्वांचा उपयोग होईल.**

This Question paper shared by Harshada from Ahmednagar, Thanks Harshada.

Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE.     Contact us: @SahajAdhyayan

हजेरी क्र.

# कनिष्ठ महाविद्यालये

## प्रथम सत्र परीक्षा सन 2021-22

इयत्ता : 11 वी
दि. 4/01/2022

विषय : मराठी

गुण - 50
वेळ - 12.00 ते 2.30

### विभाग - 1 गद्य (गुण - 12)

**कृती 1 अ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

1) पुस्तकाशी निर्दळ-चाळा करणारे अनेक [ ] 1

2) माझी पुस्तकं हीच माझी [ ] 1

3) प्रस्तुत उताऱ्यात आलेलं एक संस्कृत सुभाषित [ ] 2

एकदा एका ग्रंथप्रेमी वाचकाकडून दोन दिवसांसाठी एक पुस्तक मी वाचायला आणलं होतं. ते देताना तो ग्रंथप्रेमी मला काकुळतीनं सांगत होता, "अतिशय काळजीपूर्वक वापरा. दुसऱ्याच्या हाती देऊ नका. पुस्तकाची पानं मुडपू नका. कोणताही मजकूर पेन्सिलीनं किंवा शाईनं अधोरेखित करू नका, वरचं कव्हर काढू नका. तिसऱ्या दिवशी कटाक्षानं मला पुस्तक परत करा." त्या सूचना मला अपमानकारक वाटल्या नाहीत. हातात पडलेल्या कोणत्याही पुस्तकाशी निर्दळ-चाळा करणारे अनेक पुस्तकशत्रू मी पाहिले आहेत. त्यांच्या हिशेबी छापलेलं एक चोपडं म्हणजे पुस्तक. त्याला कसलं महत्त्व द्यायचं? पुस्तकाचा उपयोग तरी किती? भूक लागल्यावर ते शिजवून थोडंच खाता येतं? वेडे लोक वाङ्मयात अनेक रस असतात असं म्हणतात. तहान लागल्यावर तुमच्या कालिदासाच्या 'शाकुंतलातील' रस पिणं शक्य आहे काय? फार तर एकदा वाचावं किंवा चाळावं आणि मन येईल त्या भावानं फुंकून टाकावं. ही विचारसरणी अनेकांची असते, पण त्या पुस्तकप्रेमीनं मला ज्या अटी घातल्या होत्या त्या खरोखरच अत्यंत संयुक्तिक होत्या.

माझ्या हाती पुस्तक देताना त्यानं त्यावरून मायेनं अलगद हात फिरवला. मी त्याला म्हणालो, "कसलीही काळजी करू नका. माझ्या घरी सुद्धा तुमच्या पुस्तकाला माहेरी आल्यासारखंच वाटेल. त्याला सासुरवास सहन करावा लागणार नाही. ते अगदी 'योग्य स्थळी' तुम्ही देत आहात." तो हसला. त्याचं समाधान झालं असावं. मी म्हणालो, "एका संस्कृत सुभाषितात म्हटलं आहे, 'मूर्खहस्ते न दातव्यम् एवं वदति पुस्तकम्' मूर्खाच्या हाती मला देऊ नका, असं पुस्तकाचं म्हणणं आहे. माझ्या हाती ते देताना तुम्हांला माझ्या शहाणपणाबद्दल शंका आली नाही ना?" आता तो खळखळून हसला आणि म्हणाला, "अहो, दुधानं तोंड पोळल्यामुळं मी ताक फुंकून पितो आहे. काही दिवसांपूर्वी एका कवीनं माझी दोन पुस्तकं नेली. मी पंधरा दिवस वाट पाहिली. पुस्तकं मागायला गेलो तेव्हा त्यानं चक्क कानावर हात ठेवले. आपण पुस्तकं आणलीच नाहीत असं त्याचं म्हणणं आहे. आता काय करणार? पुस्तकं गिळंकृत करणं म्हणजे माझ्या दृष्टीनं भयानक प्रकार आहे. तेव्हापासून मी ठरवून टाकलं, की प्रत्यक्ष परमेश्वर आला तरी त्याला पुस्तक द्यायचं नाही. माझी पुस्तकं हीच माझी अपत्य. वाचायला भरपूर ग्रंथ असले तर मी जन्मठेपेची शिक्षासुद्धा आनंदानं सहन करीन; पण पुस्तकं नसतील तर राजवाडासुद्धा मला स्मशानासारखा वाटेल." सहज माझ्या मनात विचार आला - असे निष्ठावंत वाचक आता दुर्मिळ झाले.

4) स्वमत - अभिव्यक्ती 4

'निष्ठावंत वाचक आता दुर्मिळ झाले आहेत; हे विधान स्पष्ट करा.'

किंवा

पुस्तकांविषयीचा लेखकाचा दृष्टिकोन तुमच्या शब्दांत लिहा.

**ब) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

1) मैत्रीतले दुसरे नाव [ ] 1

2) सरोवराकाठी असणारे देऊळ [ ] 1

मागे पहा

8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi

आता नैनीतालच पहा, ना ! तीन डोंगराच्या मुठीतलं हे निळं तळं म्हणजे स्कंद पुराणात सांगितलेलं त्रिऋषी सरोवर अत्री, पुलस्त्य आणि पुलह ऋषी एकदा म्हणे हिमालयात हिंडता-हिंडता इथे आले. त्यांना पाणी हवं होतं. आणि ते मिळेना. शेवटी त्यांनी या तीन पर्वतांमधली जागा खणून काढली आणि पाणी मिळालं. तेच हे ठिकाण ! या सुंदर सरोवराकाठी नैनीदेवीचं देऊळ आहे, म्हणून हे नैनीचं सरोवर-नैनीताल कुणी म्हणतात की, दक्षयज्ञात सतीनं अपमानित होऊन यज्ञज्वाळेत प्रवेश केला तेव्हा तिचं जळालेलं शरीर खांद्यावर टाकून दु:खानं वेडापिसा झालेला शिव कैलासाकडे परत निघाला. जाता-जाता सतीचे डोळे इथे गळले म्हणून हे सरोवर म्हणजे नैनीताल-नयनताल ! नैनीताल हे सतीचंच एक रूप !

नैनीचं ते देखणं सरोवर आज मात्र शोकाचा इवलाही तरंग मनावर न उठवता तृप्तीत पसरलं आहे. या सरोवराकाठी बाजाराच्या रस्त्याचा गोल वेढा आहे आणि एकदम तिन्ही बाजूंना पर्वतावरील चढण सुरू. घरं सगळी या डोंगर उतारावर आहेत. आता खरं तर घरांपेक्षा हॉटेलच जास्त आहेत. हे गाव स्थानिक लोकांपेक्षा प्रवाशांचाच गाव जास्त आहे. बाजारात उतरला असाल, तर प्रवाशांची गजबज जाणवेलही तुम्हाला. पण एरवी जिथे कुठे उतरला असाल तिथेच जरा खिडकीत बसा किंवा व्हरांड्यात या. संपूर्ण नैनीताल तुमच्या डोळ्यात काजळासारखं भरून येतं.

3) स्वमत कृती - 'नैनीताल' या प्रेक्षणीय स्थळाचे वर्णन तुमच्या शब्दांत करा. 2

## विभाग - 2 पद्य (गुण 08)

**कृती 2 अ) खालील कवितेच्या आधारे कृती सोडवा :**

1) प्रेयसीची येण्याची वेळ - [ ] 1

2) काय ते लिहा : 1

i) शुक्राचा - [ ]

ii) सुंदरतेचा - [ ]

दवांत आलिस भल्या पहाटी
शुक्राच्या तोऱ्यांत एकदा;
जवळुनि गेलिस पेरित अपुल्या
तरल पावलांमधली शोभा
अडलिस आणिक पुढे जराशी
पुढे जराशी हसलिस;
- मागे
वळुनि पाहवें विसरलीस का ?
विसरलीस का हिरवे धागे ?
लक्ष्य कुठे अन् कुठे पिपासा,
सुंदरतेचा कसा इशारा ;
डोळ्यांमधला डाळिंबांचा
सांग धरावा कैसा पारा !

अनोळख्याने ओळख कैशी
गतजन्मींची द्यावी सांग;
कोमल ओल्या आठवणींची
एथल्याच जर बुजली रांग !
तळहाताच्या नाजुक रेषा
कुणि वाचाव्या, कुणी पुसाव्या;
तांबुस निर्मल नखांवरी अन्
शुभ्र चांदण्या कुणि गोंदाव्या !
दवात आलिस भल्या पहाटीं
अभ्रांच्या शोभेत एकदा;
जवळुनि गेलिस पेरित अपुल्या
मंद पावलांमधल्या गंधा.
(मर्ढेकराची कविता)

3) अभिव्यक्ती - 4

प्रस्तुत प्रेमकवितेचे तुम्हाला जाणवलेले वेगळेपण स्पष्ट करा.

किंवा

'दवांत आलीस भल्या पहाटी' या कवितेचे रसग्रहण करा.

**आ) पोपटी स्पंदनासाठी, कोकीळ होऊनी गाऊ .......... या काव्यपंक्तीतील अर्थसौंदर्य स्पष्ट करा.** 2

**किंवा**

**'डोळ्यांत झऱ्याचे पाणी' या शब्दसमुहातील भावसौंदर्य उलगडून दाखवा.**

मागे पहा

Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE.    Contact us: @SahajAdhyayan

8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi

This Question paper shared by Harshada from Ahmednagar, Thanks Harshada.

Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE. Contact us: @SahajAdhyayan



## विभाग - 3 साहित्य प्रकार नाटक (गुण - 6)

**कृती 3 अ) खालील कृती सोडवा.**

1) मानवाने ललितकलांचे विश्व निर्माण केले - [ ] 1

2) विष्णुदास भावे यांनी लिहिलेले पहिले नाटक - [ ] 1

मानवाने मनोरंजनासाठी, आत्मिक समाधानासाठी ललितकलांचे विश्व निर्माण केले. ज्या समाजात 'नाटक' हा साहित्यप्रकार उदयास आला, त्या समाजात राहणाऱ्या लोकांच्या भावभावना नाटकातून प्रकट झाला. त्यामुळे नाटक हा साहित्यप्रकार विषयांच्या दृष्टीने समृध्द होत गेला. ज्ञान आणि मनोरंजन याबरोबरच प्रेक्षक स्वतःच्या अनुभवांचे नाटकात घडणाऱ्या प्रसंगांशी नाते जोडत असतो. त्यामुळे त्याला ते आपले वाटते.

कथा, कादंबरी, नाटक या सर्वच साहित्य प्रकारात समाजाची समकालीन चित्रे रेखाटण्याचे सामर्थ्य असते; परंतु कथा, कादंबरी, कविता यापेक्षा नाटक हा साहित्यप्रकार निराळा आहे. बाकीचे साहित्यप्रकार हे वाचकनिष्ठ आहेत. नाटक हा समूहाचा आविष्कार असतो. नाटकामध्ये संगीत, नृत्य, वक्तृत्व, अभिनय, नेपथ्य, काव्य, चित्रकला अशा बहुतेक सर्व कलांचा समावेश होतो. कथा आणि कादंबऱ्यांमध्ये फक्त लेखक आणि वाचक हे दोन घटक असतात. पण नाटकामध्ये मात्र लेखकाचे शब्द नट संवादांच्या माध्यमातून प्रेक्षकांपर्यंत पोहोचवत असतो.

विष्णूदास भावे यांनी लिहिलेले 'सीतास्वयंवर' हे आधुनिक मराठी नाटकांतील कालमानदृष्ट्या पहिले नाटक ! एक सरळ पौराणिक गोष्ट सांगणारे हे नाटक 1843 सालचे ! त्याचप्रमाणे 1855 साली महात्मा फुले यांनी लिहिलेली 'तृतीयरत्न' ही लिखित स्वरूपातील पहिली नाट्यसंहिता होय. त्यापूर्वी ललीत, गोंधळ, कीर्तन, पोवाडे, दशावतार, तमाशे अशा अनेक कला महाराष्ट्रात नांदत होत्या. ज्या नाटक या साहित्यप्रकाराच्या उदयास पूरक ठरल्या.

**संगीत नाटक -**

अण्णासाहेब किर्लोस्कर यांच्या 'संगीत शाकुंतल' व 'संगीत सौभद्र' ह्या नाटकांद्वारे संगीतनाटक कलात्मक पातळीपर्यंत पोहोचले. भाषासौष्ठव, पात्र हाताळणी, नाट्यमयता आणि नाट्यतंत्र, सहजसोपे स्वाभाविक संवाद अशा सगळ्या बाबतीत या नाटकांनी एक मापदंड तयार केला. त्यातही सर्वात अधिक महत्वाचा होता तो त्यातला संगीताचा वापर !

आ) नाटक हा वाङ्मयप्रकार इतर वाङ्मय प्रकारांपेक्षा वेगळा आहे हे विधान स्पष्ट करा. 2

**कृती 3.2 खालीलपैकी कोणतीही एक कृती सोडवा.** 2

1) मुंबईला जात असलेल्या आगगाडीतील प्रसंग

2) 'हसवा फसवी' नाटकी उताऱ्याच्या आधारे कृष्णरावांचे व्यक्तिचित्र तुमच्या शब्दात रेखाटा.

## विभाग - 4 उपयोजित मराठी (गुण - 12)

**कृती 4 अ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** 12

1) खालील मुद्यांच्या आधारे सुत्रसंचालक होण्यासाठीची पूर्वतयारी समारे 12 ते 15 ओळीत लिहा.
सूत्रसंचालक म्हणजे ---- वाचन अपरिहार्य ---- अद्ययावतता ----- श्रवण आणि निरीक्षण ----- यावर भर ---- अत्याधुनिक संपर्क माध्यमांचा वापर ------- आवाजाची जोपासना ---- ध्वनिवर्धकाचा सराव ----- आत्मविश्वास महत्वाचा.

2) खालील मुद्याच्या आधारे मुद्रितशोधनासाठी आवश्यक ज्ञान, कौशल्य 12 ते 15 ओळीत स्पष्ट करा.
भाषेची उत्तम जाण ------ मजकूर हा अर्थपूर्ण व बिनचूक ------ मुद्रण विषयक तंत्र ------- कामावरील निष्ठा व कामाचा प्रदीर्घ अनुभव ------- अभ्यासातील सातत्य व सराव ----- अनेक विषयांची आवड.

3) खालील खुणांचा अर्थ स्पष्ट करा.

| क्र. | खुण | खुणेचा अर्थ | क्र. | खुण | खुणेचा अर्थ |
|---|---|---|---|---|---|
| 1 | = | | 4 | ! | |
| 2 | f | | 5 | ~ | |
| 3 | ⊙ | | 6 | (/) | |

मागे पहा

8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi

Contact us: @SahajAdhyayan Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE.

**विभाग - 5 व्याकरण (गुण - 12)**

**कृती - 5 खालील कृतीत दिलेल्या कंसातील योग्य पर्याय निवडून लिहा.**

**अ) शब्दशक्ती ओळखा.** 2

1) मूळ शब्दशक्ती या आहेत.

अ) एक ब) दोन क) तीन

2) 'किवडगूका आल्या, की कावळ्याची कावकाव सुरु होते.' शब्दशक्ती ओळखा.

अ) अभिधा ब) व्यंजना क) लक्षणा

**ब) काव्यगुण ओळखा.** 2

1) खरखर जर टाच मारुनी जात पुढे

चिंधड्या उडवीत राई राई एवढ्या

अ) प्रसाद ब) ओज क) माधुर्य

2) अरे संसार संसार जसा तवा चुल्ह्यावर

आधी हाताले चटके तवा मिळते भाकर

अ) माधुर्य ब) प्रसाद क) ओज

**क) वाक्यप्रकार ओळखा.** 2

1) तो उत्तीर्ण झाल्यामुळे सर्वांना आनंद झाला.

अ) केवलवाक्य ब) मिश्रवाक्य क) संयुक्तवाक्य

2) आमचा उत्साह व आमचे स्मरण वाढावे म्हणून आम्ही शीर्षासन करतो.

अ) मिश्रवाक्य ब) संयुक्तवाक्य क) केवलवाक्य

**ड) काळ ओळखा.** 2

1) मी या वर्षी काश्मीर सहलीला जाईन.

अ) भविष्यकाळ ब) भूतकाळ क) वर्तमानकाळ

2) आजीने उत्तम संस्कार केले होते.

अ) पूर्ण भविष्यकाळ ब) पूर्ण वर्तमानकाळ क) पूर्ण भूतकाळ

**इ) वाक्प्रचारांचा अर्थ ओळखा.** 2

1) मूग धरून बसणे - अ) मौन पाळणे ब) आरडाओरड करणे क) दबा धरुन बसणे

2) धावा करणे - अ) विनवणी करणे ब) आडकाठी करणे क) धमकी देणे

**फ) पुढील पारिभाषिक शब्दांचा योग्य अर्थ लिहा.** 2

1) Keyboard -

अ) फळा ब) चावी क) कळफलक

2) Organic Farming -

अ) सेंद्रिय शेती ब) रासायनिक शेती क) जैविक शेती

*****

8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi